# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१५७ दिनांक - २४/०४/२०२४

## ' परदेशी नागरीकांना रुम भाडयाने दिल्याची माहीती पोलीस ठाण्यास न दिल्याने २५ घर मालकांवरती तुळींज पोलीस ठाणेची कारवाई '

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात, तुळींज पोलीस ठाणेच्या हद्दीत प्रगतीनगर व मोरेगांव भागात मोठया प्रमाणात परकिय नागरिक हे घरे भाडे तत्वांवर घेवुन राहवयास आहेत. विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ अन्वये कोणताही परदेशी नागरीकांना कोणत्याही घरात/हॉटेल व व्यवसायीक तंत्वावर राहण्यास देणे, याबाबतची माहीती घरमालक, हॉटेल चालक यांनी २४ तासाच्या आत "सी फार्म" भरुन स्थानीक पोलीसांना परकीय नागरीक त्यांच्याकडे राहण्याकरीता आल्याची सुचना देणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास त्यांच्या विरुध्द गुन्हा नोंद करण्याची तरतुद आहे.

त्या अनुषंगाने मा.पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईदर, वसई-विरार यांनी मनाई आदेश सी.आर.पी.सी. १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये पारीत केले होते. त्यावरुन मा.पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) सो, यांनी भाडेकरु मनाई आदेश पारीत केल्यानंतर त्याबाबत पोलीसांनी वर्तमानपत्रे, भित्ती पत्रके याव्दारे समाजात जागृती केली होती.

तरीही घरमालकांनी त्यांचेकडे परकिय नागरीक हे भाडेतत्वावर राहण्यास आले त्याबाबतची माहिती पोलीस ठाणेस न दिल्याने तुळींज पोलीस ठाण्यास एकुण २५ घरमालक यांचे विरोधात गुन्हे दाखल करुन घरमालकांना अटक करुन मा.न्यायालया समक्ष हजर केले.

त्यामुळे सदर घर मालकांच्या विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याने सदर घर मालक आरोपी हे कारावासाची शिक्षा व दंडास पात्र राहणार आहेत. त्यामुळे सर्व नागरीकांनी भाडेकरु ठेवतांना त्यांची सर्व माहीती पोलीस ठाणेस दयावी. तसेच परकीय नागरीकांना घर भाडे तंत्वावर देताना त्यांचा "सी फॉर्म" भरुन घेणे बंधनकारक आहे.तरी परदेशी नागरिक यांचा " पासपोर्ट, व्हिजा " वैध नसल्यास त्यांना घरे भाड्याने देवु नयेत असे पोलीसांकडुन सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कामगीरी श्रीमती.पौर्णीमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-२ वसई, श्री.उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि दत्तात्रय पाटील,सपोनि/सुनिल पवार, पोलिस शिपाई अक्षय झांजुर्णे,राहुल साळुंखे, असे तुळींज पोलीस ठाणचे अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.